DIS/592527/2025.

PAHM-19026(11)/41/2024-PEDU

I/936180/20

अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग अधिनस्त तालुका पातळीवरुन गट विकास अधिकारी पंचायत समिती जिल्हा अहमदनगर यांनी शिक्षक संवर्गातील कर्मचारी यांना मंजूर केलेल्या **वरिष्ठ श्रेणीचे** लाभास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्राथमिक शिक्षण विभाग
आदेश क्र.कार्या-1/पीई-5/22/2025
अहिल्यानगर दि.~~28/01/2025.~~ 24/02/2025

**वाचा :-** 1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम 1961 चे 96(1)
2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग आदेश क्रं.डीएसआर-2489/2126/क-527/18 मुंबई दिनांक 4 एप्रिल, 1990.
3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग आदेश क्रं.डीएसआर/2491/2615/सीआर/40/18 मंत्रालय, मुंबई दिनांक 16 फेब्रुवारी 1991.
4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, आदेश क्रं.डीएसआर-2000/प्र.क्र.161/18 मंत्रालय, मुंबई दिनांक 31 मे, 2001.
5) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शा.नि.क्रं.शिप्रधो-2019/प्र.क्रं.43/ प्रशिक्षण/मंत्रालय, विस्तार भवन मुंबई 400 032 दि.20 जुलै, 2001.
6) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शा.नि.क्रं.शिप्रधो-2019/प्र.क्र.43/ प्रशिक्षण, मंत्रालय, मुंबई 400 032 दि. 22 ऑक्टोबर, 2021.
7) महाराष्ट्र शासन शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र 708 सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे 411 030 यांचे पत्र आय.टी./व.नि.पत्र 2022-23/4923 दिनांक 13/10/2022.
8) या विभागाचे अधिकार प्रदान आदेश क्रमांक शिक्षण/कार्या-1/पीई-5/52/0923/2023 2954 अहमदनगर दिनांक 20/06/2023.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग क्रं.डीएसआर-2489/2126/प्र.क्रं.527/18 दिनांक 04/04/1990अन्वये जिल्हा परिषदेमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी मंजूर करण्याबद्दल आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशातील परिच्छेद 4 नुसार वरिष्ठ वेतन श्रेणीत पात्र होण्यासाठी उमेदवारांनी पुर्तता करावयाच्या अटीपैकी अट "ब" नुसार या कामासाठी नियुक्त केलेल्या समितीला उमेदवारांचे कामकाज समाधानकारक वाटणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रं.डीएसआर/प्र.क्रं.289/2165/सीआर/40/18 दिनांक 11/02/1991 अन्वये या कामासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे समितीची निर्मिती केलेली आहे. जिल्हा परिषदेमधील प्राथमिक, माध्यमिक, मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांना वरिष्ठ श्रेणी /निवड श्रेणी मंजूर करण्यासाठी संबंधित कर्मचारी यांचे समाधानकारक आहे किंवा कसे याचे मुल्यमापन करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठित केलेली आहे. 1. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी- **अध्यक्ष** 2. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)- **सदस्य** 3) जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक)- **सदस्य सचिव**

या विभागाचे संदर्भ क्रमांक 8 चे आदेश क्रंमांक शिक्षण/कार्या-1/पीई-5/52/0923/2023/2954 अहमदनगर दिनांक 20/06/2023 नुसार उपरोक्त समितीस असलेले वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणी मंजुरीचे अधिकार तालुका पातळीवर पुढील प्रमाणे समिती गठित करण्यात येऊन सदर समितीस शिक्षक संवर्गातील कर्मचारी यांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी मंजुरीचे अधिकार प्रदान केले आहेत. 1.तालुक्याचे **गट** विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) जिल्हा अहमदनगर- **अध्यक्ष** 2. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व) जिल्हा अहमदनगर- **सदस्य सचिव 3.** सेवाज्येष्ठ

(शिक्षण) पंचायत समिती (सर्व) जिल्हा अहमदनगर- **सदस्य,** तसेच जिल्हा परिषद स्तरावर सामान्य प्रशासन विभागामार्फत जो निर्णय उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांचे व्दवारा घेतला जात असे त्यांचे ऐवजी तालुका पातळीवरील **सहा.गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) जिल्हा अहिलयानगर यांचेवर सोपविण्यात आलेले आहेत.** तथापि सदर अधिकार प्रदान आदेशात सदर अधिकार प्रदान केले असले तरी गट विकास अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक राहील असे संदर्भ क्रमांक 8 चे अधिकार प्रदान आदेशात नमूद केले आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) जिल्हा अहिल्यानगर स्तरावरुन शिक्षक संवर्गातील उपाध्यापक,पदवीधर, मुख्याध्यापक,केंद्रप्रमुख यांना त्यांनी धारण केलेल्या पदावर अखंडित 12 वर्षाची सेवा झालेनंतर वरिष्ठ वेतन श्रेणी मंजूर केली आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) जिल्हा अहिल्यानगर यांचे अध्यक्षेतेखालील गठित समितीने शिक्षक संवर्गातील उपाध्यापक, पदवीधर, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांना 12 वर्षाची अखंडित सेवा झालेमुळे वरिष्ठ श्रेणीचा लाभ दिलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | उपा. | पदवीधर | मुख्या. | केंद्र प्रमुख | वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मंजर केलेले कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | अकोले | आदेश जा.क्र.वशि/आस्था-1/2249/2023 दि.18.07.2023 | 70 | 05 | 02 | 02 | 79 |
| | | आदेश जा.क्र.वशि/आस्था-1/1655/2024 दि.29.07.2024 | 65 | 14 | 00 | 00 | 79 |
| 02 | राहाता | आदेश जा.क्र.आस्था-1/ववेश्रे/373/2023 दि.15/09/2023 | 31 | 03 | 02 | 00 | 36 |
| | | आदेश जा.क्र.आस्था-1/ववेश्रे/586/2023 दि.27.12.2023 | 09 | 00 | 01 | 00 | 10 |
| 03 | संगमनेर | आदेश जा.क्र.वशि/आस्था-2/472/2023 दि.25.09.2023 | 34 | 04 | 01 | 01 | 40 |
| 04 | जामखेड | आदेश जा.क्र.वशि/आस्था-1/1599/2023 दि.09.11.2023 | 42 | 00 | 00 | 00 | 42 |
| 05 | नेवासा | आदेश जा.क्र.वशि/आस्था-1/957/2023 दि.25.09.2023 | 41 | 03 | 00 | 00 | 44 |
| | | आदेश जा.क्र.वशि/आस्था-1/2241/2023 दि.15.11.2023 | 45 | 01 | 00 | 00 | 46 |
| 06 | राहुरी | आदेश जा.क्र.वशि/कार्या-2/आस्था-3/415/2023 दि.16.11.2023 | 38 | 04 | 03 | 00 | 45 |
| 07 | श्रीरामपुर | आदेश जा.क्र.आस्था-1/वरिष्ठ वेतनश्रेणी/89/2023 दि.20.11.2023 | 09 | 02 | 00 | 00 | 11 |
| 08 | शेवगाव | आदेश जा.क्र.कावि/शिक्षण/आस्था-2/827/23 दि.29.11.2023 | 90 | 01 | 00 | 00 | 91 |
| 09 | कर्जत | आदेश जा.क्र.कार्या-1/961/2023 दि.07.12.2023 | 81 | 00 | 00 | 00 | 81 |
| 10 | पारनेर | आदेश जा.क्र.आस्था-1/416/2023 दि.18.12.2023 | 49 | 04 | 01 | 00 | 54 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | अहमदनगर | आदेश जा.क्र.कार्या-2/1065/2023 दि.27.12.2023 | 47 | 09 | 00 | 00 | 56 |
| 12 | पाथर्डी | आदेश जा.क्रं.वशि/आस्था-2/2361/2023 दि.28.12.2023 | 32 | 02 | 00 | 01 | 35 |
| 13 | कोपरगाव | आदेश जा.क्र.शिक्षण/आस्था/187/2023 दि.29.12.2023 | 26 | 08 | 01 | 00 | 35 |
| 14 | श्रीगोंदा | आदेश जा.क्रं.कार्या-1/170/2024 दि.04.03.2024 | 00 | 11 | 00 | 00 | 11 |
| | | आदेश जा.क्र.कार्या-1/182/2024 दि.14.03.2024 | 93 | 00 | 00 | 00 | 93 |
| | | एकूण | 802 | 71 | 11 | 04 | 888 |

उपरोक्त् आदेशातील कर्मचारी यांना प्रस्तुत लाभ मंजुर करताना गठित समितीने वाचा संदर्भ क्रमांक 2 ते 7 मधील तरतुदी तपासून, केला असल्याने सदर मंजूरी आदेशास या आदेशाव्दवारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

वरिष्ठ् श्रेणी मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांचे सर्व संबंधित गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांनी वेतननिश्चिती करुन त्यांचे सेवापुस्तकात अचुक नोंद घेवून जिल्हा परिषद अर्थ विभागाकडून पडताळणी करावी. तसेच मंजुर लाभाचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन द्यावेत.

सदर वरिष्ठ् श्रेणीचे लाभ मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांचे आदेशामध्ये अथवा वरिष्ठ् श्रेणी मंजूर लाभाचे अनुषंगाने केलेल्या वेतननिश्चितीमध्ये काही त्रुटी उद्धवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित गट शिक्षणाधिकारी व गट विकास अधिकारी यांची राहील. तसेच सदर त्रुटीचे अनुषंगाने सुधारित दुरुस्ती आदेश आपले स्तरावर करावेत व तसे या विभागास अवगत करावे.. सदर आदेश जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर www.nagarzp.gov.in वर प्रसिध्द् केला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202502241600006 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-02-2025 12:29:14

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य् कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- शिक्षण उप संचालक, पुणे विभाग पुणे माहितीस्तव.
प्रत :- मुख्य् लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- उप मुख्य् लेखा व वित्त् अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना आवश्यक कार्यवाहिस्तव.
प्रत :- गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) . . . . . . जिल्हा अहिल्यानगर
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती (सर्व) . . . . . जिल्हा अहिल्यानगर यांना आवश्यक कार्यवाहिस्तव.
प्रत :- कार्यासन निवृत्ती वेतन शाखा शिक्षण विभाग प्राथमिक.
प्रत :- निवड नस्ती.